# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०७/२०२२** **दिनांक २०.०७.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची विशेष सभा बुधवार दि.२०.०७.२०२२ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१५८८/२०२२, दि.१५.०७.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीची विशेष सभा बुधवार दि.२०.०७.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.ना.श्री.आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.ना.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष**
**२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा. अनुराधा गोविंदराव आदिक, सदस्य**
**४. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य**
**५. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**६. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य**
**७. मा.श्री. रराहुल नारायण कनाल, सदस्य**
**८. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**९. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य**
**१०. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**११. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**
**१२. मा.श्रीमती मिना शेखर कांबळी, सदस्य**
**१३. मा.श्री.सुनिल सदाशिव शेळके, सदस्य**
**१४. मा.श्री.सुभाष दिगंबर लाखे, सदस्य**
**१५. मा.डॉ.जालिंदर बालाजी भोर, सदस्य**
**१६. मा.श्री. दत्तात्रय पांडूरंग सावंत, सदस्य**
**१७. मा.श्री.सचिन पाराजी कोते, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

समिती सदस्य मा.श्री. रराहुल नारायण कनाल, मा.श्रीमती मिना शेखर कांबळी, मा.श्री.सुभाष दिगंबर लाखे, हे सभेस ऑनलाईन उपस्थित होते.

श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०२२ योग्य पध्दतीने व उत्कृष्ठ रित्या पार पाडून उत्सवानिमित्त येणा-या सर्व साईभक्तांना उत्तम सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व समिती सदस्यांचे वतीने समिती सदस्य मा.श्री. सचिन रंगराव गुजर यांनी संस्थानचे सर्व अधिकारी, प्र.अधिक्षक/विभागप्रमुख यांचे अभिनंदन केले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

---

**विषय नं.०१** **दि.१३.०६.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उप समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४१४** **दिनांक १३.०६.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

१. **श्री.आण्णा हरी शिंदे, मदतनीस, बगीचा विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.आण्णा हरी शिंदे, मदतनीस, बगीचा विभाग यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत ताकीद देण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

२. श्री.बाळासाहेब बहिणाजी कोते, मदतनीस, बगीचा विभाग, यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बाळासाहेब बहिणाजी कोते, मदतनीस, बगीचा विभाग, यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत शेवटची ताकीद देण्यात यावी. तसेच श्री.कोते यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा विषय मा.उपसमिती सभेमध्ये सादर करुन मा.उपसमितीचे निर्णयानुसार ही शेवटची ताकीद देण्यात येत आहे, याबाबतही सुचित करावे, अशी या उपसमितीची मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

३. श्री.बापू विश्वनाथ गव्हाणे, कुशल कंत्राटी कर्मचारी, वाहन विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

श्री.बापू विश्वनाथ गव्हाणे हे संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी (कुशल) कर्मचारी म्हणून ११ महिने कालावधीकरीता सेवेत आहेत. तथापी श्री.गव्हाणे हे दि.०१.१२.२०२१ पासून ते आजतागायत कामावर विनापरवानगी गैरहजर आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.गव्हाणे यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता नियुक्त देणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

४. श्री.बापुसाहेब सोनाजी वाघमारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. बापुसाहेब सोनाजी वाघमारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत ५७ वेळा शिक्षा झालेल्या आहेत, ही बाब विचारात घेऊन श्री.वाघमारे यांना संस्थान सेवेतून निलंबीत करण्यात यावे व त्यांची विभागीय खाते चौकशी करण्यात यावी. खाते चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

५. श्री.भारत वेणूनाथ लावरे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.भारत वेणूनाथ लावरे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांना त्यांचे गैरशिस्तवर्तनासाठी वेतनवाढ रोखणेची शिक्षा देणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, तसेच श्री.लावरे यांची विभागीय खाते चौकशी करण्यात यावी. खाते चौकशी सहा महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

६. श्री.चंद्रकांत शंकर कातोरे,कंत्राटी अकुशल कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.चंद्रकांत शंकर कातोरे हे संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी (अकुशल) कर्मचारी म्हणून ११ महिने कालावधीकरीता सेवेत आहेत. श्री.कातोरे यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता नियुक्त देणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

७. श्री.कानिफनाथ नाना गोंदकर, पहारेकरी, संरक्षण विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कानिफनाथ नाना गोंदकर, पहारेकरी, संरक्षण विभाग यांचेकडून गैरशिस्तवर्तनाबाबत खुलासा मागविण्यात येऊन त्यावर प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

८. श्री.किशोर केशव क्षिरसागर,प्र.कार्यालय अधिक्षक, मुंबई कार्यालय यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.किशोर केशव क्षिरसागर, प्र.कार्यालय अधिक्षक, मुंबई कार्यालय यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे समक्ष बोलविण्यात यावे, दैनंदिन कामकाजासंदर्भात अडीअडचणी समजाऊन घेण्यात याव्यात व त्यानंतर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

९. श्री.किशोर साहेबराव गवळी, तत्कालीन प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

श्री.किशोर साहेबराव गवळी, तत्कालीन प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. श्री.गवळी हे आपले म्हणणे सभेसमोर मांडत असतांना त्यांनी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावाचा एकेरी उल्लेख केला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री.गवळी यांना समज दिली की, आपले म्हणणे मांडत असतांना शासकीय भाषेचा वापर करावा त्यामध्ये attitude नसावा.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपसमितीने श्री. गवळी यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली परंतु त्यांचे अशोभनीय वर्तन व वापरलेली भाषा याची उपसमितीने गंभीर दखल घेतली. श्री. गवळी यांचे ताब्यात असलेला सीसीटीव्ही विभागाचा डेडस्टॉक पडताळणी कामी प्रशासकीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा व याबाबत प्रशासकीय पातळीवर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

१०. श्री.महेश मधुकर टाक,कंत्राटी अकुशल कर्मचारी, सरंक्षण विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

श्री.महेश मधुकर टाक, कंत्राटी अकुशल कर्मचारी, सरंक्षण विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.महेश मधुकर टाक, हे संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी (अकुशल) कर्मचारी म्हणून ११ महिने कालावधीकरीता सेवेत आहेत. श्री. टाक यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता नियुक्त देणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

११. श्री.प्रकाश रामनाथ लुंगाडे, लिपीक टंकलेखक, बगीचा विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

श्री. प्रकाश रामनाथ लुंगाडे, लिपीक टंकलेखक, बगीचा विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.प्रकाश रामनाथ लुंगाडे, लिपीक टंकलेखक, बगीचा विभाग यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

१२. **श्री.राहूल वामन गलांडे, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**श्री. राहूल वामन गलांडे ,प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख,सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.**

**श्री.गलांडे यांची दि.२७.१२.२०२१ रोजी सीसीटीव्ही विभागाकडे बदली झालेली आहे. तथापी त्यांनी अद्यापही विभागाचा चार्ज देवाण-घेवाण यादी प्रशासन विभागाकडे सादर केलेली नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राहूल वामन गलांडे ,प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत विभागीय खाते चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**सीसीटीव्ही विभागासाठी खरेदी करण्यात आलेले कॅमेरे कार्यान्वीत आहेत का? याकामी खरेदी करण्यात आलेले २५० नग टी.व्ही.संच याबाबत चौकशी करणेकामी प्रशासकीय अधिकारी यांची समिती गठीत करण्यात यावी. समितीचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा. तसेच सीसीटीव्ही विभागाकडील डेडस्टॉकची मोजदाद करण्यात यावी. डेडस्टॉक जुळत नसेल तर यास कोण जबाबदार आहे, त्यांचेवर काय कारवाई करता येईल.याबाबत सदर अहवालात नमुद करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१३. **श्री.राजाराम पांडुरंग थेटे, लिपीक टंकलेखक, जनसंपर्क विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**श्री.राजाराम पांडुरंग थेटे, लिपीक टंकलेखक, जनसंपर्क विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राजाराम पांडुरंग थेटे, लिपीक टंकलेखक, जनसंपर्क विभाग यांनी त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत दिलेला लेखी खुलासा मान्य करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१४. **श्री. शकील दद्रुभाई सय्यद, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**श्री. शकील दद्रुभाई सय्यद, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. शकील दद्रुभाई सय्यद, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१५. **श्रीमती नेहाबाई भगवान पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती नेहाबाई भगवान पेटारे,सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत यापुर्वी २८ वेळा देण्यात आलेल्या शिक्षा विचारात घेता श्रीमती पेटारे यांना सेवानिलंबीत करुन त्यांची विभागीय खाते चौकशी करण्यात यावी. चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१६. **श्री.सोपान दौलत चौधरी, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**श्री. सोपान दौलत चौधरी, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सोपान दौलत चौधरी, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत तसेच यापुढे गैरहजर राहणार नाही याबाबत समज देण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१७. **श्री .विकास रामदास दिवटे, मदतनीस, बगीचा विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**श्री. विकास रामदास दिवटे, मदतनीस, बगीचा विभाग हे मयत झाले असल्याची माहिती सभेस देण्यात आली. त्यामुळे सदरचा विषय रद्द करण्यात आला. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१८. **श्री.विवेक अनंत गिरमे,कंत्राटी अकुशल कर्मचारी, सरंक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विवेक अनंत गिरमे, कंत्राटी अकुशल कर्मचारी, सरंक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**
**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

१९. **श्री. विठ्ठल तुकाराम पवार, मदतनीस, आरोग्य विभाग यांचे दि.१६.०३.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**श्री.विठ्ठल तुकाराम पवार, मदतनीस, आरोग्य विभाग हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विठ्ठल तुकाराम पवार, मदतनीस, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत करण्यात आलेल्या खाते चौकशी मध्ये त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले आहेत. त्यामुळे श्री.पवार यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

२०. **श्रीमती मिनाक्षी सुभाष ओहोळ, परिचारिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती मिनाक्षी सुभाष ओहोळ, परिचारिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत विभागीय खाते चौकशी करण्यात यावी. खाते चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

२१. **श्रीमती कमल थॉमस कदम, परिचारिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती कमल थॉमस कदम, परिचारिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत विभागीय खाते चौकशी करण्यात यावी. खाते चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

२२. **श्री.मोहम्मद नदिम अहमद, परफ्युजनिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**श्री. मोहम्मद नदिम अहमद, परफ्युजनिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल हे आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे सभेसमोर मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मोहम्मद नदिम अहमद, परफ्युजनिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

२३. **श्रीमती लता मधुकर बारसे, परिचारिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती लता मधुकर बारसे, परिचारिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत विभागीय खाते चौकशी करण्यात यावी. चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

२४. **श्रीमती संगीता शशिकांत कुमावत, परिचारिका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**
**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती संगीता शशिकांत कुमावत, परिचारिका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरवर्तनाचे गंभीर स्वरुप व गैरशिस्त वर्तनाबाबत १९ वेळा झालेल्या शिक्षा विचारात घेऊन श्रीमती कुमावत यांना सेवानिलंबीत करुन त्यांची विभागीय खाते चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

२५. **डॉ.संदिप भाऊसाहेब मोरे, निवासी वैद्यकीय अधिकारी,श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.संदिप भाऊसाहेब मोरे, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गंभीर स्वरुपाचे गैरशिस्तवर्तन व गैरशिस्त वर्तनाबाबत १३ वेळा झालेल्या शिक्षा लक्षात घेता डॉ.मोरे यांना सेवानिलंबीत करुन त्यांची विभागीय खाते चौकशी दोन महिन्यात पुर्ण करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०२** **दि.२१.०६.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४१५** **दिनांक २१.०६.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३** **व्दारावती भक्तनिवास इमारतीतील खोल्यांचे संडास बाथरुमचे खराब झालेले जुने लाकडी दरवाजे शटर्स ऐवजी pvc डोअर्स शटर्स बसविणेसाठी निविदाधारक क्रांती कन्स्ट्रक्शन, नाशिक यांची रु.५०,४३,३६०/-मात्रची निम्नतम दराची ई-निविदा माहितीस्तव सादर.**

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीतील खोल्यांचे संडास बाथरुमचे खराब झालेले जुने लाकडी दरवाजे शटर्स ऐवजी pvc डोअर्स शटर्स बसविणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक क्रांती कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचे निम्नतम दर रक्कम**

रु.५०,४३,३६०/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच अंदाजपत्रकीय रक्कम रु.६३,७०,३००/-वर एकुण १७.६६०२% दराने रक्कम रु.११,२५,००८/-मात्र रकमेची बँकेची प्रतिपुर्ती हमी/ डीमांड ड्राफ्ट क्रांती कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचेकडून घेण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०४** शिर्डी शहरामधुन जाणा-या कोपरगांव-अहमदनगर (एन.एच.१६०) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर व दक्षिण बाजुस स्वागत कमानी उभारणेबाबत.

**निर्णय क्र.४१७** यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर–मनमाड (NH-160) महामार्ग नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडिया (NHAI) चे अखत्यारीत असल्याने या राष्ट्रीय महामार्गाचे कामांतर्गत शिर्डी शहराच्या उत्तरेस शासकिय विश्रामगृहाजवळ अथवा नवीन बायपास रोडजवळ तसेच शिर्डी शहराच्या दक्षिणेस शिर्डी शिवेजवळ सुशोभित व आकर्षक स्वागत कमानी उभारणीसाठी परवानगी मिळणेकामी नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडिया (NHAI) यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडिया (NHAI) यांचेकडून परवानगी मिळाल्यानंतर स्वागत कमानी उभारणीचे काम देणगी स्विकारुन करण्यात यावे. तसेच देणगीदार उपलब्ध न झाल्यास सदरचे काम संस्थानमार्फत करण्यास व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. या बाबतची सर्व कार्यवाही प्रशासकीय स्तरावर करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०५** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी आवश्यक असणारे केमिकल व डीटर्जंन्ट पावडर खरेदीकामी प्राप्त न्युनतम दर माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.४१८** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी आवश्यक असणारे केमिकल व डीटर्जंन्ट पावडर खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील खालील प्रमाणे निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

मे. स्टारवीन परफेक्ट मॅन्यु. कंपनी लि., मुंबई

| अ.नं. | खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशील | मागणी परिमाण | दर |
|---|---|---|---|
| ०१ | डिटर्जंन्ट पावडर (नॉक्स १००) | ३३०० किलोग्रॅम | ६८.०० |
| ०२ | लिक्वीड द्रवरुप साबण (नॉक्स बुस्ट) | १९५० लिटर | ७२.१० |
| ०४ | लिक्वीड द्रवरुप साबण (नॉक्स वूल) | ४०० लिटर | १०७.०० |
| ०५ | पावडर - (नॉक्स सौर) | १६५० किलोग्रॅम | ९०.२० |

मे. ओंकार ट्रेडर्स, नासिक

| अ.नं. | खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशील | मागणी परिमाण | दर |
|---|---|---|---|
| ०३ | लिक्वीड द्रवरुप साबण (नॉक्स बीएसआर) | ८०० लिटर | १७१.०० |

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.०६** प्रसादालय विभागासाठी जुन-२०२२ ते सप्टेंबर २०२२ कालावधीसाठी खाद्यतेल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दर माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.४१९** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रसादालय विभागासाठी माहे जुन-२०२२ ते सप्टेंबर २०२२ कालावधीसाठी सुर्यफुल व शेंगदाणा खाद्यतेल खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील खालील निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

**M/S MAHAVIR SUPER MARKET, NASHIK**

**June 2022 to September 2022**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Rate |
|---|---|---|---|---|
| 1.00 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/ FSSAI,New 15Kg.Tin | 850.00 | Quintal | 17800.00 |

**M/S PRAMOD SUPPLIERS, MUMBAI**

**June 2022 to September 2022**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Rate |
|---|---|---|---|---|
| 1.00 | Edible Oil (Khadya Tel) Groundnut, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin | 850.00 | Quintal | 18,900.00 |

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.०७** तातडीने खरेदी केलेले गाईचे शुध्द तूप खरेदी व जादा आलेले खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४२०** यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.रजवाडी डेअरी प्रॉडक्ट, मेहसाना यांचेकडून तातडीने खरेदी केलेले १८० क्विंटल शुध्द तूप रू.३३,०००/- प्रती क्विंटल दराने खरेदीस व याकामी जादा आलेले रक्कम रू.८,२८,०००/-मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.०८** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने रेफ्रिजरेटर्स बायबॅक देऊन नवीन खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४२१** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जुने 35 नग रेफ्रिजरेटर्स बायबॅक देवुन नवीन 43 नग रेफ्रिजरेटर्स खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रूपये १६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.०९** श्री साई पालखी निवारा भक्तनिवास 'बी'इमारतीचे खोल्यांचे खिडकीकरीता लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेकामी मे.सुपर फॅब्रीकेशन अॅन्ड फर्निचर, साकुरी यांचे न्युनतम दर व्यवस्थापन समितीचे सभेत माहितीस्तव सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.४२२** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई पालखी निवारा भक्तनिवास 'बी' इमारतीचे खोल्यांचे खिडकीकरीता लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेकामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक मे.सुपर फॅब्रीकेशन अॅन्ड फर्निचर, साकुरी यांचे निम्नतम दर रक्कम रु.६,२७,७५०/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.१०** एल.ओ.टी. सिलेंडर्स मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४२३** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन व लाडू प्रसाद तयार करतांना एल.पी. गॅस इंधनाची अडचण येऊ नये, याकरीता आवश्यकता असेल त्या वेळी मे.समृद्धी इंण्डेन, राहाता यांचेकडून त्यावेळेच्या प्रचलित दराने एल.ओ.टी. सिलेंडर्स मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.११** **मंदिर परिसर, व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान आणि रुग्णालये येथील ए.सी.यंत्रणेचे एक वर्षासाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी येणा-या खर्चास तसेच ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर, साईबाबा भक्तनिवासस्थान आणि रूग्णालये येथील ए. सी. यंत्रणेचे एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अपेक्षित रक्कम रुपये १०,५४,०००/-+GST मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२** **२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२५** **श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथील २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हीसेस लि., पुणे यांचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दराबाबत चर्चा केली असता त्यांनी सांगीतले की, याबाबत संस्थानने ई-मेलव्दारे कंपनीस कळवावे म्हणजे त्यावर निर्णय घेता येईल.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथील २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०१७-१८ ते सन २०२१-२०२२ या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थानला मिळालेल्या एकुण उत्पन्नाच्या सरासरी वार्षिक १० टक्के+टॅक्स प्रती पवनचक्की प्रती वर्षाकरीता यादरात करणेबाबत तसेच सदरची रक्कम ही पुढील पाच वर्ष कालावधीकरीता कायम ठेवणेबाबत मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हीसेस लि.,पुणे यांना ई-मेलव्दारे कळविण्यात यावे, असे ठरले. सदरचे दर मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हीसेस लि.,पुणे यांना मान्य असल्यास दि. १४ ऑगस्ट २०२२ ते दि. १३ ऑगस्ट २०२७ या ०५ वर्ष कालावधीकरीता ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१३** **लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०२१-२०२२ करीता (माहे ऑक्टोंबर,२०२१ ते सप्टेंबर,२०२२) आवश्यक वाढीव किराणा मालाची टप्प्याटप्प्याने खरेदी करुन मिळणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी आवश्यक अंदाजे वाढीव किराणा मालाची संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी विभागामार्फत टप्पा-टप्प्याने खरेदी करणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे एकूण रक्कम रु.५४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१४** **'साई महिमा' या कार्यक्रमासाठी साईआश्रम निवासस्थान येथील ॲम्पीथिएटरची जागा Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai या संस्थेला १० वर्षाचे कालावधीकरीता BO तत्वावर देणेबाबतचा भाडेपट्टा करारनामा मसुदा नोंदणीकृत करणेकामी सदरची संस्था प्रतिसाद देत नसल्याने प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३० अन्वये 'साई महिमा' या कार्यक्रमासाठी साईआश्रम निवासस्थान येथील ॲम्पीथिएटरची जागा Immersity Info Tech Pvt. Ltd., Mumbai या संस्थेला शासनाची परवानगी घेऊन वापरास देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी "साई महिमा" या कार्यक्रमासाठी साईआश्रम निवासस्थान येथील ॲम्पीथिएटरची जागा Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai या संस्थेला १० वर्षाचे कालावधीकरीता BO तत्वावर देणेबाबतचा भाडेपट्टा करारनामा मसुदा नोंदणीकृत करणेकामी भविष्यातील होणा-या गर्दीचा व कोविड-१९ च्या**

परिस्थीतीचा निश्चित अंदाज घेणे शक्य नसल्याचे कारण नमुद करुन **Immersity Info Tech Pvt. Ltd., Mumbai** हे विषयांकीत प्रकल्प व त्याचा करारनामा करणेचे मनस्थितीमध्ये असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली, व तसे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)

---

**विषय नं.१५** सन २०२१-२२ (दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२) देणगीदार व मान्यवर साईभक्तांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.

**निर्णय क्र.४२८** यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयांनुसार, मान्यवर, देणगीदार व इतर यांना संस्थानमार्फत भेट स्वरुपात विनामुल्य देणेत आलेल्या पुस्तके, फोटो, सीडीज्, दैनंदिनी व दिनदर्शिका इत्यादी प्रकाशने साहित्याची खर्च रक्कम रु.३,१९,६९६/- मात्र मंजूर करण्यात येऊन, सदरची खर्चाची रक्कम प्रकाशने खर्च (Publication Expenses) खाती खर्ची टाकणे मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१६** संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांची हजेरी ८० टक्के पेक्षा कमी आहे, अशा कर्मचा-यांचे माहिती बाबत.

**निर्णय क्र.४२९** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांची हजेरी ८०% पेक्षा कमी आहे, अशा कर्मचा-यांचे माहितीबाबतचे अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-कामगार विभाग)

---

**विषय नं.१७** माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.४३०** यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०२१ ते माहे मार्च-२०२२ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येच्या अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

**विषय नं.१८** आजारी किंवा इतर कारणाने सलग ०१ वर्षे पेक्षा कमी कालावधीत गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत.

**निर्णय क्र.४३१** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद अ.नं.१४-राजेंद्र दत्तात्रय दिवेकर हे दि.२९.१०.२०१९ रोजी मयत झालेले असल्याने तसेच अ.नं ३-राजेंद्र चंद्रभान डांगे व अ.नं.११-शिवाजी उत्तम कराड यांचे आजारपणाचे/गैरहजरीचे कारण योग्य वाटत नसल्याने अ.नं.३,११ व १४ यांना वगळून उर्वरीत कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

**विषय नं.१९** श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल) वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे दि.१२.११.२०२० रोजीचे अपिल अर्ज व मा.तदर्थ समितीचे दि.२३.११.२०२१ निर्णय क्र.३२१ नुसार त्यांना करणेत आलेल्या शिक्षेचा अंमल स्थगीत ठेवणे व फेरचौकशी करणेबाबत.

**निर्णय क्र.४३२** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता यांचेकडे आर.टी.ओ. कार्यालयाकडे पैसे भरण्याची जबाबदारी निश्चित केलेली होती. त्यामुळे सदरचे कालावधीत तत्कालीन सेवानिवृत्त विभाग प्रमुख व प्र.अ. यांचे मान्यतेने टिपणी पैसे भरण्यासाठी सादर करण्यात येत होती. सदरच्या टिपण्या हया श्री.अमृत जगताप यांनी उशिराने/विलंबाने प्र.अधिक्षक, वाहन विभाग

यांचेमार्फत सादर केलेल्या असल्याने दंड भरावा लागलेला आहे. त्याबाबत तत्कालीन सेवानिवृत्त विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी श्री.जगताप यांचे गैरशिस्त वर्तनाचे अहवाल प्रशासनास सादर केलेले आहे. त्यामुळे तत्कालीन तदर्थ समितीचे दि.२३.११.२०२१ रोजीचे सभेतील निर्णक्र.३२१ नुसार इतर अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

श्री. जगताप यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत विभागीय चौकशी नैसर्गिक न्यायतत्वाला धरुन करणेत आलेली आहे. त्यात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतलेला असुन,त्यांना बचावाची पुर्ण संधी देण्यात आलेली होती. चौकशी अधिकारी यांनी त्यांचे चौकशी अहवालात श्री.जगताप हे दोषी आढळुन आल्याचे स्पष्ट नमुद केलेले असल्याने त्यांना शिक्षा करणेत आलेली होती.

श्री.जगताप यांना केलेल्या शिक्षेबाबत त्यांनी मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीमध्ये (युएलपी क्र.५/२०२१) मा.न्यायालयाचे आदेशानुसार सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.२०** **श्री.किसन लक्ष्मण पगारे, कंत्राटी अकुशल कर्मचारी, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.४३३** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.किसन लक्ष्मण पगारे, कंत्राटी अकुशल कर्मचारी, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत कंत्राटी सेवेतुन काढून न टाकता त्यांचे वर्तनात सुधारणा होणेसाठी शेवटची एक संधी देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.२१** **आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवालाबाबत व आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅंकांमध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३४** यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये केलेल्या गुंतवणूक अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. तसेच आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता, गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची, विहित पद्धतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बॅंकांकडून ३६५ दिवस (१वर्ष) किंवा ३६६ दिवसांकरीता वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून, जी बॅंक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बॅंकेत गुंतवणूक करण्यात यावी, अशी सुचना करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, राष्ट्रीयकृत बॅंकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून, जी बॅंक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बॅंकेत गुंतवणूक करण्याची कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात येते. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

**विषय नं.२२** **आर्थिक अनुदान मागणीकरिता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४३५** यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०४.२०२२ ते ३०.०६.२०२२ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीबाबत आलेले अर्ज फाईल करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६१,१०,७९८/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे एप्रिल-२०२२ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६१,१०,७९८/-मात्र ची नोंद घेऊन सदरचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.२४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६०,६५,९३९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मे-२०२२ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६०,६५,९३९/-मात्र ची नोंद घेऊन सदरचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.२५ मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोंबर-२०२१ ते मार्च २०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.४,४६,०३,००७/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑक्टोबर २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयात एकुण रुग्ण संख्या १,३४,२९३ वर रक्कम रु.४,४६,०३,००७/-मात्र रक्कमेचे वैद्यकीय उपचार व औषधांवरील झालेल्या खर्चाची नोंद घेऊन सदर खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.२६ मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२२ ते मे-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.१,६६,६२,८४९/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२२ ते मे-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.१,६६,६२,८४९/-मात्र खर्चाची नोंद घेऊन सदर खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.१ दि.३०.०६.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उप समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

दिनांक ३०.०६.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. सदर उपसमिती सभेमध्ये खालील प्रमाणे शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

१. महात्मा ज्योतीबा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेव्यतीरीक्त रुग्णांवर वैद्यकिय उपचार केल्यास संबंधीत डॉक्टरांना पुर्वीप्रमाणे मंजुर दरानेच प्रोत्साहन भत्ता चालु ठेवण्यात यावा, तसेच शस्त्रक्रियांची यादी संबंधीत डॉक्टरांनकडुन ओटी इन्चार्ज यांचे मार्फत घेवुन Annexure –A प्रमाणे निश्चित केलेल्या कॅटेगरीनुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

२. महात्मा ज्योतिबा फुले व आयुष्यमान भारत या योजने अंतर्गत होणारे उपचार/ शस्त्रक्रिया यांचे बिलापोटी विमा कंपनीकडुन रुग्णनिहाय प्रत्यक्ष रक्कम प्राप्त झाल्यानंतरच संबंधीत डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात यावा. तसेच काही तांत्रिक बाब वगळता बिले सादर करण्यास दिरंगाई झाल्याने विमा कंपनीकडून रक्कम मिळाली नाही, असे निदर्शनास आल्यास संबधीतावर कारवाई करण्यात यावी, अशी या उपसमिती शिफारस आहे.

---

३. महात्मा ज्योतिबा फुले व आयुष्यमान भारत या योजने अंतर्गत होणारे शस्त्रक्रिया यांचे बिलापोटी प्राप्त होणारे रकमेतुन (इम्प्लांटचे रक्कम वगळुन) जनरल सर्जन, आर्थो सर्जन, न्युरो सर्जन, युरो सर्जन, मॅक्सिलोफेशियल सर्जन, स्त्रिरोग तज्ञ, कान नाक घसा तज्ञ व नेत्र चिकिस्कक यांना १५% व भुलतज्ञ डॉक्टरांना सर्जन डॉक्टरांना मिळणारे १५% रकमेवर ३०% देय राहील, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

४. कार्डीओलॉजीस्ट, इंटेसीव्हीस्ट व भुलतज्ञ यांना महात्मा ज्योतिबा फुले व आयुष्यमान भारत या योजने अंतर्गत होणारे उपचार/प्रोसिजर्स यांचे बिलापोटी खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

| अ नं | तपशील | पॅकेज रक्कम (इम्प्लांट सह) | कार्डीओलॉजीस्ट प्रोत्साहन भत्ता | इंटेसिव्हीस्ट प्रोत्साहन भत्ता | कॅथलॅब रजिस्टर मधिल नोंदीप्रमाणे समावेश असलेले कॅथलॅब तंत्रज्ञ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व कॅथलॅब प्रोसिजर्स | १०,००० पर्यंत | ५००/- | ५०/- | ५०/- |
| २ | | १०,००१ ते २०,००० | २०००/- | १५०/- | ७५/- |
| ३ | | २०,००१ ते ३०,००० | ३०००/- | १५०/- | १००/- |
| ४ | | ३०,००१ ते ४०,००० | ४०००/- | १५०/- | १००/- |
| ५ | | ४०,००१ पासुन पुढे | ६०००/- | १५०/- | १००/- |

तसेच ज्या कॅथलॅब प्रोसिजर्समध्ये भुलतज्ञ डॉक्टरांचा समावेश असेल अशा प्रोसिजर्सवर कार्डीओलॉजीस्ट यांना देय असणा-या प्रोत्साहन भत्त्यामधुन २०% रक्कम भुलतज्ञ डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता म्हणुन देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

५. कार्डीयाक सर्जन, भुलतज्ञ व इंटेसीव्हीस्ट यांना महात्मा ज्योतिबा फुले व आयुष्यमान भारत या योजने अंतर्गत होणारे उपचार/शस्त्रक्रिया यांचे बिलापोटी खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

| अ नं | तपशील | पॅकेज रक्कम (इम्प्लांट सह ) | कार्डीयाक सर्जन प्रोत्साहन भत्ता | भुलतज्ञ प्रोत्साहन भत्ता | इंटेसिव्हीस्ट प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व कार्डीयाक शस्त्रक्रिया | वीस हजार पर्यंत | ३०००/- | ९००/- | २४०/- |
| २ | | वीस हजार पुढे ते पन्नास हजार | ६०००/- | १८००/- | ४८०/- |
| ३ | | पन्नास हजार पुढे ते सत्तर हजार | ८०००/- | २४००/- | ६४०/- |
| ४ | | सत्तर हजारपुढे ते एक लाख | १००००/- | ३०००/- | ८००/- |
| ५ | | एक लाखाचे पुढे | १२०००/- | ३६००/- | ९६०/- |

तसेच CVTS OT रजिस्टर मधील नोंदीप्रमाणे कार्डीयाक शस्त्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष समावेश असलेले परफ्युजनिस्ट यांना इंटेसिव्हीस्ट डॉक्टरांना मिळणा-या प्रोत्साहन भत्याच्या ५०% रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणुन देण्यात यावा, तसेच उपरोक्त मुद्दा क्र.४ व ५ चे प्रोत्साहन भत्ता दर महात्मा ज्योतीबा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेव्यतीरिक्त (Paid/Staff Patient) वैद्यकीय उपचार/शस्त्रक्रिया करण्यात येणा-या रुग्णांवरही लागु राहील. अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

६. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर व जनरल स्पेशालीटी डॉक्टरांना ओपीडी केसपेपर, तपासणी, प्रोसीजर्स व व्हीजीट यांवर मिळणारा प्रोत्साहन भत्ता पुर्वीचे दराप्रमाणेच देण्यात यावा, तसेच व्हिजीटींग डॉक्टरांनी केलेल्या शस्त्रक्रियेच्या दिवसानंतर संबधीत विभागातील पुर्ण वेळ असलेल्या तज्ञ डॉक्टरांनी उपचार/तपासणी करावी. उपचार/तपासणी करणा-या पुर्णवेळ तज्ञ डॉक्टरांना केलेल्या उपचार/तपासणी यावर संस्थान नियमानुसार अधिक व्हिजीटींग डॉक्टरांच्या शस्त्रक्रिया प्रोत्साहन भत्त्यामधुन ५ % प्रोत्साहन भत्ता देय राहील, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------

७. दोन्ही रुग्णालयातील मानधन तत्वावरील तज्ञ डॉक्टरांना खालील तक्त्यामध्ये नमुद स्पेशालिटीनुसार मासीक वेतन व प्रोत्साहन भत्ता देय राहील, तसेच संस्थानसेवेत कायम असणा-या डॉक्टरांना पुर्वीप्रमाणेच वेतन देय राहील, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>स्पेशालीटी</th><th>दरमहा एकुण मानधन रक्कम</th><th>कायम व मानधन डॉक्टरांना दरमहा देय असलेला प्रोत्साहन भत्ता</th></tr>
<tr><td>१</td><td>Super Speciality Consultant (Cardiologist, Cardiac Surgeon, Neuro Surgeon, Urology, Oncology, Plastic Surgeon etc.)</td><td>२ लक्ष</td><td rowspan="3">मासीक वेतनाच्या ७५% रकमेपेक्षा जास्त प्रोत्साहन भत्ता रक्कम झाल्यास त्यापुढील रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणुन देय राहील.</td></tr>
<tr><td>२</td><td>General Consultant (Ortho, General Surgeon, Gynaecologist, Maxillofacial Surgeon, E.N.T. Surgeon, Ophthalmologist, etc.)</td><td>१.२५ लक्ष</td></tr>
<tr><td>३</td><td>Radiologist, Sonologist</td><td>१.५० लक्ष</td></tr>
<tr><td rowspan="5">४</td><td><u>Physician</u></td><td></td><td rowspan="5">मासीक वेतनाच्या ३०% रकमेपेक्षा जास्त प्रोत्साहन भत्ता रक्कम झाल्यास त्यापुढील रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणुन देय राहील.</td></tr>
<tr><td>Medicine</td><td>३ लक्ष</td></tr>
<tr><td>Neurologist</td><td>२.५ लक्ष</td></tr>
<tr><td>Nephrology</td><td rowspan="2">१.५ लक्ष</td></tr>
<tr><td>Paediatrician</td></tr>
<tr><td>५</td><td>Pathologist/Histopathologist</td><td>१ लक्ष</td><td>मासीक वेतनाच्या ५०% रकमेपेक्षा जास्त प्रोत्साहन भत्ता रक्कम झाल्यास त्यापुढील रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणुन देय राहील.</td></tr>
</table>

तसेच दोन्ही रुग्णालयातील कायम/मानधनावरील डॉक्टरांना किमान उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. १ ते ३ मधील डॉक्टरांना वेतनाच्या ७५%, अ.क्र. ४ मधील डॉक्टरांना वेतनाच्या ३०%, अ.क्र. ५ मधील डॉक्टरांना वेतनाच्या ५०% काम करणे बंधनकारक राहील. तसेच किमान मर्यादेपेक्षा कमी काम केल्यास संबंधीत डॉक्टरांना देण्यात येणारे मासीक वेतन व प्रोत्साहन भत्याचे विवरण वैद्यकीय संचालक यांनी प्रशासकीय अधिकारी यांचे मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाहनिशा करुन काही गंभीर बाब असेल तर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात येऊन व्यवस्थापन समितीमध्ये होणा-या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------

८. त्वचारोग तज्ञ,मानसोपचार तज्ञ, परफ्युजनिस्ट व कॅथलॅब तंत्रज्ञ यांना मासीक वेतनाच्या ३०% रकमेपेक्षा जास्त प्रोत्साहन भत्ता रक्कम झाल्यास त्यापुढील रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणुन देय राहील, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------

९. संस्थान सेवेत कायम/मानधनावरील असणा-या दोन्ही हॉस्पिटलमधील पॅथोलॉजी विभागामध्ये (पॅथोलॉजीस्ट व हिस्टोपॅथोलॉजीस्ट) कार्यरत असणा-या डॉक्टरांच्या कामाचे नियोजन वैद्यकिय संचालक/उप वैद्यकिय संचालक यांनी करावे. जेणेकरुन सर्वांना सम प्रमाणात प्रोत्साहन भत्ता मिळेल. (सुट्टीवर असलेल्या डॉक्टरांना त्या दिवसाचे प्रोत्साहन भत्ता अदा केला जाणार नाही) अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

१०. भुलतज्ञ/इंटेन्सीव्हीस्ट डॉक्टरांना सध्या लागु असलेल्या वेतनाप्रमाणे मासीक वेतन देय राहील, भुलतज्ञ डॉक्टर यांना मासीक वेतनाच्या ४०% व इंटेन्सीव्हीस्ट डॉक्टर यांना मासीक वेतनाच्या ३०% रकमेपेक्षा जास्त प्रोत्साहन भत्ता रक्कम झाल्यास त्यापुढील रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणुन देय राहील तसेच सर्व भुलतज्ञ/इंटेन्सीव्हीस्ट डॉक्टरांचे दरमहा रोटेशन करण्यात यावे जेणेकरुन सर्वांना सम प्रमाणात प्रोत्साहन भत्ता मिळेल. याबाबत वैद्यकिय संचालक/उप वैद्यकिय संचालक यांनी यावर नियंत्रण ठेवावे. अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

११. प्रत्येक महिण्यामध्ये प्रत्यक्ष अदा करण्यात येणा-या मासीक वेतनावर प्रोत्साहन भत्याची गणना करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

१२. फिजीशिअन डॉक्टरांनी दररोज ओपीडी व आयपीडी रुग्णांना तपासणे/पाहणे बंधनकारक राहील, तसेच आयसीयु/जीआयसीयु/सीआरयु/सर्जीकल आयसीयु मध्ये रुग्णांना तपासणी/पाहणी करणेचा व्हिजीट चार्ज ओपीडी चार्ज पेक्षा दुप्पट आकारणी करावी तसेच इतर वार्डमध्ये पुर्वीप्रमाणेच व्हिजीट चार्जची आकारणी करावी. त्याप्रमाणे प्रोत्साहन भत्त्याची गणना करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

१३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कार्यरत असलेल्या सर्व विभागांमध्ये होणा-या ओपीडी, आयपीडी, तपासणी, शस्त्रक्रिया यांचे मासीक विवरणासह वार्षीक माहिती अहवाल एमआरडी विभागाने मा. व्यवस्थापन समितीपुढे माहितीस्तव प्रस्ताव सादर करावा, त्यामुळे डॉक्टरांच्या कामाचे मुल्यमापन होईल, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

१४. संस्थान कर्मचा-यांचे (कायम/कंत्राटी) मोफत झालेल्या वैद्यकिय उपचार/तपासण्या/शस्त्रक्रियावर डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

१५. वैद्यकिय प्रशासनातील पदे जसे वैद्यकिय संचालक, उप वैद्यकिय संचालक, वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय अधिक्षक, इत्यादी पदांवर कार्यरत अधिकारी, प्रभारी अधिकारी व अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेले अधिकारी यांना पुर्वीप्रमाणेच प्रोत्साहन भत्ता (वेतन आयोग ६ मधील (बेसिक+ग्रेड पे) वेतनाचे चे २००%) देण्यात यावा. सध्या वैद्यकिय संचालक व उप वैद्यकिय संचालक यांना देण्यात येणारे मासीक मानधन/वेतन समान असुन वैद्यकिय संचालक व उपवैद्यकिय संचालक या पदासाठी देण्यात येणारे मासीक मानधन/वेतन मध्ये फरक असावा. त्यामुळे वैद्यकिय संचालक यांना १.२५ लक्ष मासीक मानधन/वेतन देण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस आहे.

**सध्या देण्यात येत असलेले मासीक वेतन व प्रोत्साहन भत्ता खालीलप्रमाणे.**

| वैद्यकिय प्रशासकिय पदे | मासीक वेतन/ मानधन | वेतन आयोग ६ प्रमाणे बेसिक व ग्रेड पे | बेसिक+ग्रेड पे प्रमाणे २००% प्रोत्साहन भत्ता | एकुण (२+४) |
|---|---|---|---|---|
| वैद्यकिय संचालक | १,०२,५०० | २१,९००+७,६०० | ५९,००० | १,६१,५०० |
| उप वैद्यकिय संचालक | १,०२,५०० | २१,९००+७,६०० | ५९,००० | १,६१,५०० |

---

१६. **दोन्ही रुग्णालयामध्ये नविन डॉक्टरांची नियुक्ती करण्यासाठी जाहिरात देताना संबंधीत पदासाठी देण्यात येणारे एकुण मासीक वेतन रक्कम अधिक संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देणेबाबत उल्लेख करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

१७. **ज्या वैद्यकीय अधिका-यावर शिस्तभंगाची कार्यवाही केलेमुळे ५ वेळेस नोटीस बजावली असेल किंवा ३ वेळेस जर दोषी/ सिध्द झाले असेल असे वैद्यकीय अधिका-यांचे त्या दिवस/काळातील प्रोत्साहन भत्ता बंद किंवा वसुल करणेत येईल. परंतू यानंतर सुधारणा न झाल्यास तेथुन पुढे मिळणारा प्रोत्साहन भत्ता रकमेमधुन ५०% प्रोत्साहन भत्ता कायमस्वरुपी बंद करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

१८. **ज्या वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता लागु असेल त्या वैद्यकीय अधिका-यांना इतर (सानुग्रह अनुदान, NPA व इतर) कोणतेही भत्ते मिळणार नाही, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

१९. **ज्या वैद्यकीय अधिका-याला मुळ पदा व्यतीरीक्त इतर कामाची जबाबदारी प्रभारी म्हणुन दिली असेल परंतु त्यांचे मुळ पदाला व प्रभारी पदाला प्रोत्साहन भत्ता लागु आहे असे वैद्यकीय अधिकारी यांना कोणत्याही परिस्थितीत एकच पदाचा प्रोत्साहन भत्ता लागु राहील. याबाबत प्रभारी पदाचे नेमणुक आदेशामध्ये सदर बाबीचा उल्लेख करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

२०. **प्रोत्साहन भत्ता देय असलेल्या वैद्यकीय अधिका-यांना (व्हिजीटींग डॉक्टर वगळुन) वार्षीक आयकर विवरणपत्र (IT Return file) किंवा 26 AS किंवा AIS यापैकी एक छायांकीत प्रत प्रत्येक वर्षी माहे ऑक्टोबर मध्ये संस्थानकडे जमा करावी लागेल. विवरणपत्र (IT Return file) किंवा 26 AS किंवा AIS विहीत मुदतीस प्राप्त न झाल्यास प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात येणार नाही. तसेच वित्त विभागाकडून सदर विवरणपत्राची शहानिशा करुन आलेल्या त्रुटीबाबत संबंधीत डॉक्टरांकडून खुलासा घेऊन तसेच अहवाल वरिष्ठांचे पुढे सादर करुन त्यांनी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करणेत येईल. याबाबत नेमणुक आदेशामध्ये नमुद करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

२१. **प्रोत्साहन भत्ता देय असलेल्या वैद्यकीय अधिका-यांना (व्हिजीटींग डॉक्टर वगळुन) खाजगी वैद्यकीय व्यवसाय करत नसलेबाबत प्रत्येक नियुक्ती आदेशानुसार प्रतिज्ञापत्र संस्थान रुग्णालयाकडे जमा करणे बंधनकारक राहील. तसेच खाजगी वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर वैद्यकीय अधिका-यांचा प्रोत्साहन भत्ता तात्काळ बंद करण्यात यावा व संबंधीत कालावधीत अदा करण्यात आलेली प्रोत्साहन भत्ता रक्कम वसुल करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

२२. **संस्थान रुग्णालय विभागाकडे कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी हे खाजगी वैद्यकीय व्यवसाय करत आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी संस्थान मधील प्रशासकिय अधिका-यांचे तपासणीपथक नेमण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

२३. **संस्थान रुग्णालयातील बी.डी.एस (डेंटीस्ट), आहारतज्ञ व फिजिओथेरपिस्ट यांना प्रोत्साहन भत्ता देय होणार नाही, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

---

२४. **श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा हॉस्पिटल हे Super Speciality व श्री साईनाथ हॉस्पिटल हे General Specialty म्हणुन दोन रुग्णालये चालविली जात आहेत, परंतु श्री साईबाबा हॉस्पिटलमध्येही General Speciality उपचार होत असल्याने Super Speciality (Cardiologist, Cardiac Surgeon, Neuro Surgeon, Nephrology, Urology, Oncology, Neuro & Medicine Physician, Maxillofacial Surgeon, Plastic Surgeon) चे डॉक्टरांना वैद्यकिय उपचार करण्यासाठी खाटांची उपलब्धता कमी होत असल्याने श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये होणारे General Speciality ( Ortho, General Surgeon, Dentist) उपचार सध्या कार्यरत असलेल्या डॉक्टरांसह**

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वर्ग करण्यात यावेत, जेणेकरुन Super Speciality डॉक्टरांना जास्त प्रमाणात खाटांची संख्या उपलब्ध होईल व त्याप्रमाणे प्रशासकिय कामकाज करणे सुलभ होईल. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आकृतीबंधातील General Speciality ची पदे आवश्यकतेनुसार श्री साईनाथ रुग्णालयाकडे वर्ग करण्यात यावीत व जास्तीची पदे रद्द करण्यात यावीत. त्यामुळे संस्थानवर पडणारा आर्थिक बोजा कमी होईल, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

२५. General Speciality विभाग श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वर्ग झाल्यानंतरही श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आवश्यकतेप्रमाणे अपघात विभाग व विविध वार्डमध्ये भरती असलेल्या रुग्णांची तपासणी करावी. तसेच तपासणी केलेल्या रुग्णांचा संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

२६. Radiology विभाग पुर्वीप्रमाणेच दोन्ही रुग्णालयामध्ये चालु ठेवुन पॅथोलॉजी विभाग पुर्णपणे श्री साईनाथ रुग्णालय येथे सुरु करण्यात यावे, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांचे सॅपल घेऊन श्री साईनाथ रुग्णालयामध्ये पाठविण्यात यावेत म्हणजे दोन्ही रुग्णालयाचे पॅथोलॉजी व हिस्टोपॅथोलॉजीचे काम एकाच छताखाली सुरु करुन होणा-या तपासण्यांचे एकत्रीत अहवाल करता येईल. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल विभागात तात्काळ कराव्या लागणा-या तपासणीसाठी त्यासंबंधीत विभागातील कर्मचारी व उपकरणे श्री साईबाबा हॉस्पिटलध्ये ठेवण्यात यावेत, याबाबत चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

---

२७. जनसंपर्क अधिकारी/सोशल वर्कर, रुग्णालये यांनी ओपीडी व आयपीडी रुग्णांना भेटुन संस्थान रुग्णालयातील दिले जाणारे वैद्यकीय उपचार, तपासणी व शस्त्रक्रियासाठी तसेच संस्थान रुग्णालयातील लागु असलेल्या योजनेबाबत योग्य ते मार्गदर्शन व सल्ला देणेचे करावे, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

**निर्णय क्र.४४०** यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३०.०६.२०२२ रोजीचे उपसमिती सभेमधील उपरोक्त १ ते २७ मुद्दयांपैकी ज्या बाबींवर प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करणे शक्य आहे, त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी. व उर्वरीत मुद्दे स्थगीत ठेवण्यात येऊन नंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुन:सादर करण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२ सन २०२२-२३ करीता श्री साई प्रसादालयातील डीश वॉशिंग (ताटे धुणे) मशिन करीता व भांडी धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.४४१** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री प्रसादालयासाठी सन २०२२-२३ करीता आवश्यक असणारे २४,००० लिटर लिक्विड सोप- [Neutral Grade (PH-7.8 to 8.5), Capacity : 1 Ltr. Liquid soap in 10 Ltr. Water, Packing : 50 Ltr. Drum, Purpose : For Manual dish wash & Dish Washing Machine] विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारी अंदाजित रक्कम रु.७,२०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.३ मंदिर परिसर, साईधर्मशाळा, श्री साई प्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, कनकुरी साठवण तलाव या इमारतीवरती व परिसरातील स्ट्रीट लाईट करीता एल.ई.डी. स्ट्रीट लाईट फिटींग खरेदी करुन बसविणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील निम्नतम दर माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.४४२ सदर विषयावर चर्चा सुरु असतांना काही कंपन्या एल.ई.डी. बसवुन व सर्व मेन्टनन्स करुन देतात याकामी वर्षाला ठरावीक रक्कम आकारतात, या संदर्भात सभेमध्ये संस्थानची आर्थिक बचत होईल अशी माहिती चर्चेअंती समोर आली. त्याची सत्यता पडताळून सदरची बाब संस्थानचे फायद्याची होत असेल तर सदरचा विषय निरस्त करण्यात यावा. अशा कंपन्यांची माहिती समिती सदस्य मा.श्री.दत्तात्रय सावंत यांचेकडून घेऊन सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरले.

तसेच सदरची बाब ही संस्थानचे आर्थिकदृष्टया फायदेशीर नसेल तर सदरचा विषय मान्य करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.४ प्रसादालय विभागाकरीता जुन २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीसाठी वनस्पती तूप खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दर माहितीसाठी सादर करणेबाबत.

निर्णय क्र.४४३ यावर सविस्तर होऊन, प्रसादालय विभागाकरीता जुन-२०२२ ते सप्टेंबर-२०२२ या कालावधीसाठी वनस्पती तूप खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.श्री. ट्रेडर्स, संगमनेर यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

**M/s Shree Traders, Sangamner**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate |
|---|---|---|---|---|
| 1 | Vanaspati Tup- (15 Kg tin) FSSAI/AGMARK., Gemini | 300 | Quintal | 16,500 |

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.५ सन २०२२ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन १९७७ पासून तसेच सन २०२०-२१ मध्ये कोरोना काळातही विहित मान्यतेने संस्थान कर्मचारी यांना दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदान वाटप करणेत आलेले असल्याने प्रस्तावीत केलेप्रमाणे सन २०२२ चे दिपावली उत्सवासाठी प्रस्तावात नमुद अट शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०२१ ते ३० सप्टेंबर, २०२२ या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने लेखाशाखा विभागाचे अहवालानूसार अंदाजे रक्कम रुपये १२,००,००,०००/- मात्र इतके सानुग्रह अनुदान वाटप/आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थानकडे प्रतिनियुक्तीवर असलेले शासकीय अधिकारी यांना सन-२०२२ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देणेस मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.६ श्री साईसच्चरित पारायण सोहळयात आयोजित करावयाचे सांस्कृतिक कार्यक्रम निश्चित करणेस व मानधनाबाबत.

निर्णय क्र.४४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित पारायण सोहळयात आयोजित करावयाचे सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये खालील प्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | मोफत द्यावयाच्या रुम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शुक्रवार,दि.२९ जुलै २०२२ सायं.५.०० ते ६.०० | पारायणार्थी महिला मंडळ शिर्डी | हळदी कुंकू समारंभ (साईआश्रम शताब्दी मंडप) | - | - | - |
| | रात्रौ ७.३० ते ९.३० | आदर्श माध्यमिक विद्यालय शिर्डी | विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम (साईआश्रम शताब्दी मंडप) | १५० | विनामुल्य | - |
| | रात्रौ ७.३० ते ९.३० | नृत्यात्मि डान्स स्टुडिओ, शिर्डी | भरतनाटयम कार्यक्रम. (श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप) | ३० | विनामुल्य | - |
| ०२ | सोमवार,दि.१ऑगस्ट २०२२ दुपारी ३.०० ते ५.०० | दि.१ ऑगस्ट २०२२ ते ०५ ऑगस्ट २०२२ पर्यंत.आचार्य श्रवणजी महाराज, दिल्ली यांचा श्री सॉई अमृत कथेचा कार्यक्रम | श्री साई अमृत कथा (श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप) | २० | विनामुल्य | (५ रुम ५ दिवस कार्यक्रम ) व्दारावती भक्तनिवास |
| ०३ | मंगळवार, दि.२ ऑगस्ट २०२२ दुपारी ३.०० ते ५.०० | आचार्य श्रवणजी महाराज, दिल्ली | श्री साई अमृत कथा | -- | -- | - |
| ०४ | बुधवार, दि. ३ ऑगस्ट २०२२ दुपारी ३.०० ते ५.०० | आचार्य श्रवणजी महाराज, दिल्ली | श्री साई अमृत कथा | -- | -- | -- |
| ०५ | गुरुवार ,दि.४ ऑगस्ट २०२२ दुपारी ३.०० ते ५.०० | आचार्य श्रवणजी महाराज, दिल्ली | | -- | -- | -- |
| ०६ | शुक्रवार,दि.५ऑगस्ट२२ दुपारी ३.०० ते ५.०० | आचार्य श्रवणजी महाराज, दिल्ली | श्री साई अमृत कथा | -- | -- | -- |
| | रात्रौ ७.३० ते ९.३० | अनंत राधाकृष्ण दिंडी पथक, गोवा | साई नामाच्या दिंडीची लोककला | ३५ | विनामुल्य | १० रुम २ दिवस साईआश्रम नं.१ भक्तनिवास |
| | सकाळी १०.०० ते १२.०० | ह.भ.प. श्री.गंगाधर बुवा व्यास,डोंबीवली | यांचे काल्याचे कीर्तन (साईआश्रम नं.१ शताब्दी मंडप ) | ०५ | ७,००० | (२ रुम २ दिवस) व्दारावती भक्तनिवास |
| ०७ | पारायणातील विणेकरी | - | - | ०४ | - | (१ रुम ८ दिवस साईआश्रम नं.१ भक्तनिवास |

तसेच उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केलेल्या कलाकारांबरोबर खालील कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | मोफत द्यावयाच्या रुम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दि.४ ऑगस्ट, २०२२ सायं.९.०० वा. | श्री देव कुडाळेश्वर महिला दशावतार नाटय मंडळ, कुडाळ | भगवान श्रीकृष्ण चरित्रावर आधारित गरुड गर्वहरण पौराणिक नाटक | २५ | विनामुल्य | ९ रुम, २ दिवस साई आश्रम नं.१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | दि.५ ऑगस्ट, २०२२ दुपारी ०३.०० वा. श्री साईसच्चरित्र (पोथी) मिरवणूक | महेश दत्तात्रय कुडाळकर, कुडाळ, (कुडाळेश्वर मित्र मंडळ) | मिरवणूकीत कला सादर करणारे कलाकार (३ चित्ररथ, मेकअपमन व प्रवास खर्च ) | ४० | १,१०,०००/- | (१० रुम ३ दिवस साई आश्रम भक्तनिवास / साईबाबा भक्तनिवास ५०० रुम) |
| ३ | दि.५ ऑगस्ट, २०२२ दुपारी ०३.०० वा. मिरवणूक संबळ, ढोल ताश्या वाजवणारे | पुणे, शिर्डी परिसरातील संबळ, ढोल ताश्या वाजवणारे कलाकार | ----- | ५० | १,००,०००/- | साई धर्मशाळा २ हॉल |

या व्यतिरीक्त काही कलाकांरानी पारायण सोहळा कालावधीत विनामुल्य कार्यक्रम करण्याची इच्छा दर्शविल्यास उपलब्धतेनुसार त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे, असे ठरले.

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.७** मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णय होणे अगोदर महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील श्री.पा.म.ताकटे, नाशिक, कंत्राटी खातेचौकशी अधिकारी यांना ०४ अपचारी यांचे खातेचौकशी अधिकारी म्हणून केलेल्या नेमणूकीबाबत.

**निर्णय क्र.४४६** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.पा.म.ताकटे यांचा समावेश महाराष्ट्र शासनाचे चौकशी अधिकारी नेमणूकीचे पॅनलमध्ये आहे. श्री.ताकटे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करणेस तत्कालीन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१९.०६.२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यामुळे श्री.ताकटे यांना दि.१९.०६.२०२१ चे अगोदर देण्यात आलेल्या चौकशापैकी श्री.गवळी यांची चौकशी पुर्ण करुन प्रशासनास सादर केलेला असल्याने, श्री.गवळी यांची पुन्हा चौकशी करणे अभिप्रेत नाही याकरीता सदरचा चौकशी अहवाल स्विकारणेस मान्यता देण्यात आली. तसेच उर्वरित तीन अपचारी यांच्या ज्या चौकशा सद्यस्थितीत चालु आहेत त्या श्री.ताकटे यांचेकडून पुर्ण करुन घेण्यास व त्यांना नियमाप्रमाणे मानधन अदा करणेस मान्यता देण्यात आली.

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.८** श्री.राहुल रामचंद्र इंगवले, मदतनीस, विद्युत विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

**निर्णय क्र.४४७** श्री.राहुल रामचंद्र इंगवले हे विद्युत विभागात मदतनीस या पदावर कार्यरत आहेत. श्री.इंगवले यांनी दि.२१.०५.२०२२ रोजी रात्रौ ९.०० वा. साईधर्मशाळा भक्तनिवास (साईआश्रम भाग-०२) या ठिकाणी असलेल्या आर ब्लॉकमधील रुम नंबर ०३ मधील विद्युत विभागाचे सब स्टोअरमधून एल.ई.डी. टयुब लाईटचे तसेच एल.ई.डी.बल्बचे अंदाजे रक्कम रु.२२,५००/- इतक्या किंमतीचे मटेरियल कोणास काही एक न कळविता स्वत:च्या पदाचा गैर वापर करुन स्वत:च्या फायदयाकरिता चोरुन नेण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री.इंगवले हे उपरोक्त साहित्य खाजगी रिक्षामधुन साई धर्मशाळा दक्षिणेकडील गेटमधुन संस्थान हद्दीतुन बाहेर नेत असतांनी आढळुन आलेले आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक मिडीया व दै. वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्याने संस्थानची व प्रशासनाची बदनामी झालेली आहे. त्यामुळे संस्थानचे नावलौकीकास बाधा निर्माण झालेली आहे. संस्थान प्रशासनाबद्दल साईभक्तांमध्ये गैरसमज निर्माण झालेला आहे. श्री.इंगवले यांचे सदरचे कृत्य गंभीर गैरशिस्तवर्तनात मोडते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राहुल रामचंद्र इंगवले, सेवा निलंबीत मदतनीस, विद्युत विभाग यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ

संस्थानचे सेवेतून सेवा निलंबित केले असुन त्यांना विभागीय चौकशी करणेकरीता अभिकथन/दोषारोप पत्र बजाविणेबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.९ श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारती व परिसरात बसविलेल्या सर्व वॉटर कुलरचे सन २०२२-२३ या एक वर्षासाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारती व परिसरात बसविलेल्या सर्व १६५ नग वॉटर कुलरचे सन २०२२-२३ या एक वर्षासाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५,७८,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० संस्थानचे श्री साई प्रसादालय येथे करावयाच्या विविध दुरुस्ती देखभालीचे कामांबाबत.

निर्णय क्र.४४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय परिसरात प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कामे करणेस व यासाठी येणारे अंदाजित रक्कम रु.२०,४५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वर्कशॉपचे सिमेंट पत्रे काढून त्याऐवजी कलर कोटेड शीट बसविणे, प्रसाधनगृह नूतनीकरण व परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे इत्यादी कामासाठी अंदाजे रु.१,१४,३७,२५१/- खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वर्कशॉपचे सिमेंट पत्रे काढून त्याऐवजी कलर कोटेड शीट बसविणे, प्रसाधनगृह नूतनीकरण व परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे इत्यादी कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,१४,३७,२५१/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यापैकी एलएक्यू/एसआर/ ०७/२००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूंसदर्भ क्र.३८/२०१२ दाखल केला होता त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाप्रमाणे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई अदा करणेबाबत.

निर्णय क्र.४५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२२.०७.२०२२ रोजी मा.उपसमितीची सभा आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये सदरचा विषय तसेच वाढीव भुसंपादनाबाबतचे इतर विषय चर्चेसाठी घेण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग/विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ मोतीचुर लाडू अधिक चांगला व स्वादिष्ट होण्याचे दृष्टीने साखरेच्या पाकातील मळी काढणेकामी दुध खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०७ जून, २०२२ रोजी सुप्रसिध्द सेफ श्री संजीव कपुर यांनी लाडु विभागास दिलेल्या भेटी दरम्यान दिलेल्या सुचनांनुसार तसेच मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.१९, निर्णय क्र.३९५ नुसार कार्यवाही करणेसाठी एक क्विंटल साखरेचे प्रमाण गृहीत धरुन पाकातील मळी काढणेसाठी किमान ५०० मि.लि. दुध वापरावे लागणार आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागात दैनंदिन ३५ ते ४० क्विंटलचे लाडु तयार केले जातात. त्यास दैनंदिन अंदाजे २० लिटर दुधाचा वापर गृहीत धरल्यास, वार्षिक अंदाजे ७००X१२=८,४०० लिटर्स दुधाची आवश्यकता भासणार आहे. सदरचे दैनंदिन लागणारे दुध संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे रितसर मागणी नोंदवुन मागणी करण्यास तसेच याकामी येणा-या वार्षिक अंदाजे रु.३,३६,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१४ संस्थानचे १२५ वाहने, विद्युत जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन पुरवठयाबाबत स्वयंपुर्ण होणेकरीता अंतर्गत इंधन व्यवस्था सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.४५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय मा.उपसमिती सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१५ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.२७,७९,०२८/- मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे,उपरोक्त प्रस्तावामधील नमुद ३० कर्मचाऱ्यांना (रुग्ण ३३) देय असलेली रक्कम रु.२७,७९,०२८/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१६ डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, ई.एन.टी.सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल (प्रत्यक्षकाम–श्री साईनाथ रुग्णालय) यांचे खाते चौकशीबाबत.

निर्णय क्र.४५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, ई.एन.टी.सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल प्रत्यक्षकाम श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत चौकशी अधिकारी श्री.पा.म.ताकटे यांनी खाते चौकशी पुर्ण करुन दि.१७.०९.२०२१ रोजी दिलेला चौकशी अहवाल स्विकारणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१७ श्री नरसिंव्ह सरस्वती मेडिकल फाऊंडेशनचे इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिटयुट, आळंदी या रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबत.

**निर्णय क्र.४५६** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री नरसिंव्ह सरस्वती मेडिकल फाऊंडेशनचे इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युट, आळंदी, पुणे यांनी संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने सदर रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय सेवा सशुल्क करणेबाबत.

**निर्णय क्र.४५७** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) सुरु झाल्यानंतर श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय सेवा नाममात्र शुल्क आकारुन सशुल्क करण्यात याव्यात, असे ठरले.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळ, सुरेगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचेमार्फत तीन दिवसीय राज्यस्तरीय पर्यावरण संमेलनाला विनामुल्य सहकार्य मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४५८** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत झिरो बजेट नैसर्गिक शेती तसेच विषमुक्त अन्न यांची माहिती शेतक-यांना होणेसाठी शिर्डी येथे दि.२८.०८.२०१८ ते दि.०२.०९.२०१८ असे ०६ दिवसांचे निशुल्क निवासी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्या धर्तीवर निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळ, सुरेगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचेमार्फत दि.२७.१०.२०२२ ते दि.२९.१०.२०२२ असे तीन दिवसांचे राज्यस्तरीय पर्यावरण निवासी संमेलन आयोजित करण्यास व त्यासाठी संस्थानमार्फत व्यवस्था पुरविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,६८,६१०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच याकामी प्रस्तावात नमुद १ ते ७ नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०**
**ठराव क्र.४५९** दि.०६.०४.२०२२ रोजी झालेल्या उपसमिती सभेमध्ये विषय नं.१-श्री साईबाबा संस्थानतर्फे कॅन्सर युनिट विषय सादर करण्यात आलेला होता.

त्यावर उपसमिती सभेमध्ये खालील प्रमाणे शिफारस करण्यात आलेली आहे.

'यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कॅन्सर युनिट सुरु करणेबाबतचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राथमिक स्तरावर कॅन्सरचे आजारावरील उपचार सुरु करणे संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी आढावा घेऊन त्यांचे कार्यकक्षेत याबाबत कार्यवाही करावी. व त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे माहितीसाठी सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.'

तथापी सदर उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेकामी दि.२७.०४.२०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर केले असता उपरोक्त विषय स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.

आजचे सभेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, शिर्डी परिसराचे आसपास कॅन्सर हॉस्पिटल नाही. त्यामुळे योग्य वेळेत या आजाराबाबत माहिती न झाल्याने व शेवटच्या टप्प्यामध्ये उपचाराचे पर्याय नसल्याने रुग्ण हकनाक या आजाराला बळी पडून मृत्युमुखी पडतात. तसेच आपण नविन कॅन्सर हॉस्पिटल सुरु करत नसुन कॅन्सर आजाराचे Diagnostic Centre सुरु करीत आहोत. व ही बाब upgradation स्वरुपाची व प्रशासकीय स्तरावर होण्याजोगी आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कॅन्सर युनिट सुरु करणेबाबत उपसमितीचे दि.०६.०४.२०२२ रोजीचे सभेतील विषय नं.१ मध्ये करण्यात आलेली शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२१
ठराव क्र.४६० दि.०६.०४.२०२२ रोजी झालेल्या उपसमिती सभेमध्ये विषय नं.२- रुग्णालयामध्ये नविन डॉक्टरांची नियुक्ती करणेपुर्वी त्यांना द्यावा लागणा-या प्रोत्साहन भत्त्याबाबत निर्णय घेणेकरीता विश्वस्त व वैद्यकिय अधिका-यांची संयुक्त कमिटी स्थापन करणेबाबतचा विषय सादर करण्यात आलेला होता.

त्यावर उपसमिती सभेमध्ये खालील प्रमाणे शिफारस करण्यात आलेली आहे.

'यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयामध्ये नविन डॉक्टरांची नियुक्ती करणेपुर्वी त्यांना द्यावा लागणा-या प्रोत्साहन भत्त्याबाबत निर्णय घेणेकरीता संस्थान अंतर्गत प्रशासकीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीने याबाबतचा अहवाल तयार केलेला आहे. सदर अहवालाबाबत या समितीशी अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या सदस्यांशी मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा. श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक व मा.श्री.महेंद्र गणपतराव शेळके यांनी चर्चा करुन याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.'

तथापी सदर उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेकामी दि.२७.०४.२०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर केले असता उपरोक्त विषय स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.

आजचे सभेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, संस्थानचे रुग्णालयामधील डॉक्टरांना द्यावयाचा प्रोत्साहन भत्त्यामध्ये बदल करणे ही बाब रुग्णालये सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी, संस्थानवरील आर्थिक बोजा कमी करण्यासाठी, डॉक्टरांचे कामकाजात शिस्त पालन येऊन त्यांना त्यांचे कामाचा योग्य मोबदला मिळावा तसेच रुग्णांना चांगल्या सेवा मिळाव्यात याकरीता आवश्यक आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयामधील डॉक्टरांना द्यावयाच्या प्रोत्साहन भत्त्याबाबत उपसमितीचे दि.०६.०४.२०२२ रोजीचे सभेतील विषय नं.२ मध्ये करण्यात आलेली शिफारस मान्य करण्यात आली, तथापी डॉक्टरांना द्यावयाच्या प्रोत्साहन भत्त्यामध्ये बदल करणेकामी ज्या बाबींवर प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करणे शक्य आहे, त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी, असे ठरले.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२२
ठराव क्र.४६१ श्री साईनाथ रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सुरु करणेकामी आवश्यक असणारे १५ कर्मचारी तातडीने देण्यात यावेत.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/सामान्य प्रशासन विभाग /कामगार विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२३
ठराव क्र.४६२ मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०६.२०२२ रोजीचे सभेतील ठराव क्र.३९८ नुसार श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये उत्कृष्ठ प्रतिचे पापड वापरणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग/श्री साई प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४**
**ठराव क्र.४६३** सुप्रसिध्द शेफ श्री.संजीव कपुर हे शिर्डी येथे आले असता त्यांचेकडून आलेल्या माहितीनुसार बेसनपीठ, ज्वारी व बाजरी यापासुन प्रसाद तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५**
**ठराव क्र.४६४** मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा डायरी व टेबल कॅलेंडर यांचे नमुने सभेमध्ये दाखविले व त्यानुसार नियमीत छपाई व्यतिरिक्त विविध प्रकारचे टेबल कॅलेंडर, श्री साईबाबांचे फोटो व इतर छपाई आवश्यकतेनुसार करुन घेण्यास व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६**
**ठराव क्र.४६५** संस्थानचे वाहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या बसेसची संख्या, शैक्षणिक संकुलाकरीता आवश्यक असणा-या स्कुल बस व बसेसचा इतर वापर या सर्व बाबी विचारात घेऊन साईभक्तांचे सोयीकरीता नगरसुल रेल्वे स्टेशन ते शिर्डी दरम्यान सशुल्क बस सेवा सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७**
**ठराव क्र.४६६** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०५.२०२२ रोजीचे सभेतील ठराव क्र.३२४ नुसार दर गुरुवारी मंदिरातुन निघणा-या पालखी सोहळयाचे वेळी प्रथा-परंपरेनुसार होणारे विधी वगळून श्रींचा कोट (वस्त्र) घेणे अशा प्रकारचे जे विधी मंदिर प्रमुख/पर्यवेक्षक करतात असे विधी पालखी सोहळयाकरीता उपस्थित असलेले मा.समिती सदस्य यांनी करण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्यांचे हस्ते करण्यात यावेत.

(कार्यवाही-संरक्षण विभाग/मंदिर विभाग/विधी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८**
**ठराव क्र.४६७** संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त झालेले पुजारी श्री.सुलाखे गुरु व श्री.जोशी गुरु यांना प्रशिक्षणार्थी पुजारी म्हणूण घेण्यात आलेल्या कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यासाठी विनावेतन सहा महिने कालावधीकरीता संस्थान सेवेत घेण्यात यावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९**
**ठराव क्र.४६८** मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.५४ व ५५ मधील संस्थान मालकीचे जागेचा अनाधिकृतपणे गैरवापर होत असुन याठिकाणी अवैद्य धंदे चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. यास अटकाव व्हावा याकरीता सदर जागेस वॉल कंपाऊंड करण्यास संमती दर्शविण्यात आली व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग/मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०**

**ठराव क्र.४६९** **मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०५.२०२२ रोजीचे सभेतील ठराव क्र.३५२ नुसार शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी गु.र.नं.३१०/२०२१ अन्वये गुन्हामध्ये अटक झालेल्या संस्थान कर्मचा-यांपैकी आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी राहूल मारुती फुंदे व सचिन लक्ष्मण गव्हाणे यांना पुर्ववत आऊटसोर्स पध्दतीने ठेकेदारामार्फत कामावर घेणेबाबत नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी, असा ठराव करण्यात आलेला होता.**

**तथापी या दोन्ही कर्मचा-यांवर एफआरआय दाखल झालेला असुन सदरची बाब न्यायप्रविष्ठ असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०५.२०२२ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.४७ ठराव क्र.३५२ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास/सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१**

**ठराव क्र.४७०** **दर्शनरांग बांधकाम प्रकल्पाच्या आर्किटेक्ट श्रीमती सोनिया कापरे हया आजचे सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित होत्या. चर्चेअंती दर्शनरांग बांधकाम प्रकल्पाचे नियोजनामध्ये तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयामुळे काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आले. उदा. साईभक्तांनी श्रींचे दर्शन घेतल्यानंतर सदर साईभक्तांना पुन्हा पादत्राणे ठेवलेल्या ठिकाणी येण्यासाठी स्वतंत्र मार्गाची व्यवस्था दिसून येत नाही. त्यामुळे अशा व इतर त्रुटी दुर करण्यासाठी या कामाचे आर्किटेक्ट यांनी तात्पुरत्या व कायमस्वरुपी उपाय योजना सुचवावी व याकामाचे आराखडे व अंदाजपत्रक सादर करावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**वरील निर्णय/ठराव क्र.४१७ ते ४७० सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर सायं. ७.४५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**